सत्यमेव जयते

**मुख्य मंत्री**

महाराष्ट्र

**शुभेच्छा**

२ फेब्रुवारी २००९



८९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन येत्या १४ व १५ फेब्रुवारी रोजी बीड येथे होत असल्याचे समजून आनंद वाटला.

मराठी नाटक हा मराठी माणसाच्या भावविश्‍वाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. मराठी संस्कृतीची ती महत्वाची ओळख आहे. मराठी नाटकांची वैभवशाली परंपरा असून देशामध्ये मराठी रंगभूमीने वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. प्रेक्षकांची अभिरुची संपन्न करणारी अनेक नाटके मराठी रंगभूमीने दिली आहेत. नाटकांचा जनमानसावर अतिशय मोठा प्रभाव पडत असल्याने त्यात समाजजीवनात भेडसावत असलेले विविध प्रश्‍न, समस्या, अंतर्विरोध यांचा कौशल्याने उपयोग केला पाहिजे.

मराठी नाट्यसृष्टीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि दर्जेदार मराठी नाट्यनिर्मितीसाठी राज्य शासनातर्फे भरघोस अर्थसहाय्य दिले जाते. त्यामुळे अधिकाधिक दर्जेदार नाटकांची निर्मिती होईल आणि मराठी रंगभूमी अधिक समृध्द होईल यात शंका नाही. नाट्य संमेलनात नाटकांच्या विविध पैलूंबाबत या क्षेत्रातील मान्यवर साधक-बाधक चर्चा करतील आणि नाट्यरसिक या संमेलनाचा निखळ आनंद लुटतील अशी अपेक्षा आहे.

८९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**अशोक चव्हाण**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे

८९वे मराठी

**नाट्य संमेलन**

कै. केशरबाई क्षीरसागर नाट्य नगरी, बीड.